महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
Email : cgmp@mahadiscom.in
Website : www.mahadiscom.in

क्र.मासंवि/रवका/न.क्र.१०/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
प्रकाशगड, ४ था मजला, प्लॉट नं.जी-९,
प्रो.अनंत काणेकर मार्ग, स्टेशन रोड,
बांद्रा (पुर्व), मुंबई - ४०० ०५१.
दुरध्वनी क्रमांक : ०२२- २६४७५९९५
फॅक्स क्रमांक ०२२-२६५८०६४२

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ४०३ दि. ०२ / ०४ / २०१२

विषय : महावितरण कंपनीतील वाहनचालक या संवर्गातील कर्मचाऱ्यांना द्यावयाच्या निळया प्लेनेल वुलन कापड खरेदीची व शिलाईची प्रतिपुर्ती देणेबाबत.

.....

संहिताबध्द सर्वसाधारण आदेश क्र.१ दि.३१.१०.१९७२ मधील तरतुदीनुसार महावितरण कंपनीतील वाहनचालक या संवर्गामधील पात्र कर्मचाऱ्यांना दिल्या जाणाऱ्या निळया प्लेनेल वुलन कापड खरेदी व शिलाईच्या प्रतिपुर्तीच्या दरामध्ये वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव काही काळापासून कंपनीच्या विचाराधीन होता.

२. आता सक्षम अधिकाऱ्यांनी महावितरण कंपनीतील वाहनचालकांना दिल्या जाणारे ५०" X ५२" चे २.९० मीटर निळया रंगाचे प्लेनेल वुलन कापड खरेदी करून वुलनकोट व पॅन्ट अस्तरासहित शिऊन घेण्यासाठी देण्यात येणाऱ्या रकमेच्या प्रतिपुर्तीच्या दरामध्ये खालील तक्त्यातील रकाना क्र.५ मध्ये दर्शविल्याप्रमाणे वाढ करण्यास मंजूरी प्रदान केली आहे.

| अ.क्र. | विवरण | संवर्ग | कालावधी | सुधारित प्रतिपुर्तीचे दर |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | निळया प्लेनेल वुलन कापड २.९० मीटर X रु.९३५ = रु.२७११/- + प्लेनेल वुलनकोट व पॅन्ट अस्तरासहित शिलाई रु.९५०/- | वाहनचालक | ४ वर्षातून एकदा जानेवारी २०११ ते डिसेंबर २०१४ | रु.३६६१/- (प्लेनेल कापड व अस्तरासहित शिलाई) |

३. संहिताबध्द सर्वसाधारण आदेश क्र.१ दि.३१.१०.१९७२ मधील अटी व शर्तींच्या अधीन राहून वाहनचालकांनी वुलन कापड खरेदी करून कंपनीच्या नियमाप्रमाणे शिऊन घ्यावेत आणि शिलाई बिलाच्या तारखेपासून दोन महिन्याच्या आत देयके प्रतिपुर्तीसाठी संबंधीत अधिकाऱ्यांकडे सादर करावीत. ज्या कर्मचाऱ्यांनी या परिपत्रकाच्या पुर्वीच वरील गटवर्षाकरिता उपरोक्त साहित्य वाढीव दराने खरेदी केले आहे त्यांनासुध्दा सादर केलेल्या देयकानुसार वाढीव प्रतिपुर्ती देय राहील.

४. सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या इंट्रानेटवर उपलब्ध करण्यात आले आहे.

*(विजय भि. बागुल)*
***मुख्य महाव्यवस्थापक (मासं)***

D:\O&M\Adm Cir - F.N.10-Uniform.doc
2/4/2012